मुलांसाठी बाइबल
प्रस्तुत

# येशू आणि लाजरस



लेखक: Edward Hughes

रेखाचित्रकार: Janie Forest

रूपान्तरकार: Ruth Klassen

अनुवादक: Rev. Shilas Gavit

निर्माता: Bible for Children
www.M1914.org

©2014 Bible for Children, Inc.
परवाना (लाइसेंस): तुम्ही जोपर्यंत ही गोष्ट विकत नाहीत,
तोपर्यंत तुम्ही ती कॉपी किंवा मुद्रित करू शकता.

मार्था आणि मरिया यांना
काळजी वाटत होती. त्यांचा भाऊ
लाजर आजारी होता – फारच
आजारी होता. लाजर कदाचित
लवकरच मरण पावेल असे त्या
बहिणींना कळून आले होते.
त्यांनी येशूला बोलावणे
पाठविले. बेथानी गावातील
या कुटुंबावर येशूचे प्रेम होते.



जेंव्हा येशूने लाजराविषयी ऐकले तेंव्हा त्याने त्याच्या शिष्यांना असे म्हटले, "या आजाराचा शेवट मरणात होणार नाही." जरी येशू कित्ती तरी मैल दुर होते, तरी लाजरासंगती काय घडत आहे हे येशूला अगदी बरोबर माहित होते.




बेथानीला जाण्यासाठी येशूने दोन दिवस वाट पाहिली. आणि त्यानंतर तो असे काही बोलला की त्यामुळे त्याचे शिष्य गोंधळात पडले. "लाजर मेला आहे. आणि मी तेथे नव्हतो म्हणून तुमच्यासाठी मला आनंद वाटतो, कारण माझी अशी इच्छा आहे की, तुम्ही विश्वास ठेवावा."
या नवलाईच्या शब्दांचा काय अर्थ होता? येशूने काय करण्याची योजना केली होती?

जेंव्हा येशू
बेथानीला येऊन पोचला,
तोवर लाजराला मरुन चार
दिवस झाले होते. त्याला
प्रेतवस्त्रांत गुंडाळून, गुहेत
तयार केलेल्या कबरेत
ठेवले होते.



मार्था येशूला वाटेत भेटायला गेली. येशूने तिला म्हटले, "तुझा भाऊ पुन्हा उठेल." मार्थाने उत्तर दिले की, "तो शेवटल्या दिवशी, पुनरुत्थानसमयी पुन्हा उठेल हे मला माहित आहे." लाजराला पाहण्यासाठी तीला शेवटल्या दिवसापर्यंत वाट पाहावी लागेल असे तिला वाटले होते.



परंतू येशूला काहीतरी वेगळे सांगावयाचे होते.





येशू मार्थाला म्हणाला, "पुनरुत्थान व जीवन मिच आहे, जो माझ्यावर विश्वास करतो, तो मेला असला तरी जगेल."मार्था येशूवर विश्वास करत होती. तो देवाचा पुत्र आहे हे ती जाणून होती. परंतू तो लाजराला कशी मदत करु शकेले?

लाजर मरण पावल्यामुळे सर्वजण दुःखी होते. त्याची बहिण मरिया रडत होती. तिला सांत्वन देणारे सर्वजण रडत होते. येशू देखिल रडला.



लोकांसोबत येशू कबरेजवळ
गेला. कबरेच्या तोंडावर एक
मोठा दगड ठेवला होता.



"धोंड बाजूला करा" असा आदेश येशूने दिला.
त्यावर मार्था म्हणाली, "प्रभुजी, आता
त्याला दुर्गंधी येत असेल; कारण
त्याला मरुन चार दिवस
झाले आहेत."




येशूने आदेश
दिल्यामुळे लोकांनी
कबरेवरिल धोंड बाजूला
केली. मग येशूने त्याच्या
स्वर्गिय पित्याची प्रार्थना केली.
देवाने येशूला पाठवले आहे हे
सिध्द् करणारा एक महान
चमत्कार येशू करणार होता.


त्याने मोठ्याने हाक
मारुन म्हटले, "लाजरा,
बाहेर ये !" कबरे जवळ
जमा झालेले लोक
कदाचित विस्मयाने टक
लावून पाहात असावेत.
मेलेल्या माणसाला येशू
जिवंत करु शकेल का?


होय !
लाजर
कबरेतून
बाहेर आला,
प्रेतवस्त्रे
गुंडाळलेला
असा तो
कबरेच्या बाहेर
जिवंत आला
– जिवंत.

येशूने त्यांना म्हटले, "त्याला मोकळे करुन जाऊं द्या."



तेथे कित्ती आनंद झाला ! अश्रूंचे रुपांतर हास्यात झाले. येशूने त्याचे शब्द पाळले. लाजर पुन्हा जिवंत झाला. केवळ देवाचा पुत्रच मेलेल्यांना जिवन देऊ शकतो.



हि घटना पाहणाऱ्या पुष्कळ लोकांनी येशूवर विश्वास ठेवला. परंतू पुष्कळांनी जाऊन मंदिराचे पुढारी जे येशूचे शत्रू बनले होते त्यांना येशूने काय केले ते सांगितले. हेव्याने भरुन त्यांनी येशूला ठार मारण्याची योजना आखली. येशूला जेंव्हा हे कळले तेंव्हा येशू काही दिवस पर्यंत त्यांच्यापासून दुर निघून गेला.



येशू आणि लाजरस

परमेश्वराची वाणी – बाइबल मधून गोष्ट

घेण्यात आली आहे

योहान ११

"तुझ्या वचनांच्या उलगड्याने प्रकाश प्राप्त होतो."
स्तोत्रसंहिता ११९:१३०

# समाप्त

बाइबलमधील ही गोष्ट आम्हांला आमच्या सुंदर परमेश्वराविषयी सांगते ज्याने आम्हांला बनविले आणि ज्याची अशी इच्छा आहे की आम्ही त्याला ओळखावे.

परमेश्वराला माहित आहे की आम्ही वाईट गोष्टी केल्या आहेत, ज्याला तो पाप म्हणतो. पापाची शिक्षा मरण आहे, पण परमेश्वर तुमच्यावर इतके प्रेम करतो की त्याला तुमच्या पापांची शिक्षा मिळावी आणि वधस्तंभावर मरावे म्हणून त्याच्या एकुलता एक पुत्र येशू याला पाठविले. नंतर येशू जिवंत झाला आणि स्वर्गातील घरी गेला. जर तुम्ही येशूमध्ये विश्वास ठेवता आणि तुमच्या पापांसाठी त्याने क्षमा करावी अशी त्याला विनंती करता, तर तो नक्की क्षमा करील. तो आता तुमच्याबरोबर येऊन राहील आणि तुम्ही त्याच्याबरोबर कायम राहणार.

हे सत्य आहे यावर जर तुम्ही विश्वास ठेवता, तर परमेश्वराला हे सांगा:
प्रिय येशू, तू परमेश्वर आहेस आणि माझ्या पापांसाठी मरण पावण्यास मनुष्य बनला आणि आता तू जिवंत आहे यावर माझा विश्वास आहे. कृपा करून माझ्या जीवनात ये आणि माझ्या पापांची मला क्षमा कर, जेणेकरून आता मला नवीन जीवन प्राप्त होईल, आणि एके दिवस मी कायम तुझ्याबरोबर राहण्यासाठी येईन. तुझी आज्ञा पाळण्यासाठी आणि तुझे मूल होऊन जगण्यासाठी मला मदत कर. आमेन.

बाइबल वाचा आणि परमेश्वराशी रोज बोला! योहान 3:16